जा.क्र.उमा-३/११वीप्र/कोवि/**२०२२-२३/** 5278
शिक्षण उपसंचालक कार्यालय, कोल्हापूर
दिनांक — 11 JUL 2022

प्रति,

शिक्षणाधिकारी (माध्यमिक)
जिल्हा परिषद, कोल्हापूर/सांगली/सातारा/रत्नागिरी/सिंधुदुर्ग

**विषय :- इ. ११ वी. प्रवेश सन-२०२२-२३ बाबत सूचना**
**(कोल्हापूर व गडहिंग्लज शहरस्तरीय केंद्रीय प्रवेश वगळून)**
**संदर्भ :- १.या कार्यालयाचे दि.३०.०६.२०२२ चे पत्र**

उपरोक्त विषयास अनुसरुन आपणास कळविणेत येते की, **मार्च, २०२२** मध्ये घेण्यात आलेल्या माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षेचा ऑनलाईन निकाल दि.१७.०६.२०२२ जाहीर झाला. महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक मंडळाच्या विदयार्थ्यांना **सोमवार, दिनांक ०४/०७/२०२२** रोजी विद्यार्थ्यांना गुणपत्रक मिळाली आहेत. सबब सन २०२२-२३ ची इयत्ता ११ वी साठी प्रवेश अर्ज स्विकृती प्रक्रिया दि.६/०७/२०२२ पासून सुरु करणेबाबत संदर्भाधीन पत्रान्वये आपणास कळविण्यात आले होते. त्यानुषंगाने प्रवेश प्रक्रियेचे पुढील वेळापत्रक सोबत जोडले आहे त्यानुसार **आपल्या जिल्हयातील सर्व कनिष्ठ** महाविद्यालयांच्या **प्राचार्य/मुख्याध्यापकांना इ.११ वी प्रवेश सन २०२२-२३ बाबत खालील प्रमाणे सूचना देण्यात याव्यात:-**

१. **महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक मंडळा व्यक्तिरिक्त अन्य महामंडळाच्या निकालाबाबत स्पष्टता नसल्याने सदर विदयार्थ्यासाठी १० टक्के जागा रिक्त ठेवण्यात याव्यात.**
२. इ.११ वी प्रवेश प्रक्रिया राबवत असताना शालेय शिक्षण विभाग शासन निर्णय दि. २६ जून,१९९७ मधील तरतुदी, व त्यानंतर वेळोवेळी शासनाने प्रवेशासंबंधी निर्गमित केलेल्या शासन आदेश व शासन पत्रांतील तरतुदींचे पालन करणे.
३. इ.११ वी प्रवेश गुणवत्ता व आरक्षण धोरण यानुसार होतील याची दक्षता घ्यावी.
४. प्रवेश प्रक्रियेमध्ये आर्थिकदृष्या दुर्बल घटकांसाठी १० टक्के जागा आरक्षित ठेवणेबाबत काटेकोरपणे आमंलबजावणी करणे. (सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय क्रमांक राआधो-४०१९/प्र.क्र.३१/१६-अ दि.१२ फेब्रुवारी, २०१९)
५. कोविड-१९ चा प्रादुर्भाव लक्षात घेता आपल्या जिहयातील मा.जिल्हा आपत्ती व्यवस्थापन अधिकारी यांनी वेळोवेळी निर्गमित केलेल्या सूचनेनुसार प्रवेश प्रक्रिया राबविण्यात यावी.महाविदयालयाच्या परिसरात अनावश्यक गर्दी होणार नाही यासाठी आवश्यक त्या उपाययोजना कराव्यात.
६. अनुदानित तुकडयातील वाढीव विद्यार्थी क्षमतापूर्ण झालेनंतरच क्रमाने विनाअनुदानित तुकडयामधील प्रवेश क्षमता पूर्ण करावी.
७. इ. ११ वी प्रवेश देतांना मंजूर क्षमतेपेक्षा जादा प्रवेश देणेत येवू नयेत जेणे करुन परिसरातील मंजूर तुकडयावर अनिष्ट परिणाम होणार नाही याची दक्षता घ्यावी.मंजूर क्षमतेपेक्षा जादा प्रवेश दिल्यास कनिष्ठ महाविदयालयाचे प्राचार्य/मुख्याध्यापक जबाबदार राहतील.

इ.११ वी. प्रवेशाबाबत पालक व विद्यार्थी यांना नाहक त्रास होणार नाही व कोणत्याही प्रकारची तक्रार या कार्यालयास प्राप्त होणार नाही याची दक्षता घ्यावी. आपल्या जिल्हयातील इ. ११ वी. प्रवेश प्रक्रिया शांततेत व सुरळीत पार पाडणेचे दृष्टीने योग्य ते नियोजन करावे. **प्रवेश प्रक्रिया कमीत-कमी वेळेत पूर्ण होण्यासाठी सर्व घटकांना सहाय्य करण्याचे निर्देश देण्यात यावेत. तसेच प्रवेश प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर प्रवेश प्रक्रियेची एकत्रित माहिती या कार्यालयास सादर करावी.**

(महेश चोथे)
**शिक्षण उपसंचालक,**
**कोल्हापूर विभाग, कोल्हापूर**

# इयत्ता ११ वी. प्रवेश प्रक्रिया सन २०२२-२३ कोल्हापूर विभागाचे वेळापत्रक

## कोल्हापूर, सांगली, सातारा, रत्नागिरी व सिंधुदुर्ग जिल्हयांसाठी

(कोल्हापूर व गडहिंग्लज शहरस्तरीय केंद्रीय प्रवेश वगळून)

| दिनांक | वार | कालावधी | कार्यवाही |
|---|---|---|---|
| १२.०७.२०२२<br>१३.०७.२०२२<br>१४.०७.२०२२<br>१५.०७.२०२२<br>१६.०७.२०२२ | मंगळवार<br>बुधवार<br>गुरुवार<br>शुक्रवार<br>शनिवार | **५ दिवस** | फॉर्म देणे व स्विकारणे. |
| १८.०७.२०२२<br>१९.०७.२०२२ | सोमवार<br>मंगळवार | **२ दिवस** | प्रवेश अर्जांची छाननी, तपासणी व गुणवत्ते नुसार निवड यादी व प्रतिक्षा यादी तयार करणे. |
| २०.०७.२०२२ | बुधवार | **१ दिवस** | दुपारी ३-०० वाजेपर्यंत निवड यादी व प्रतिक्षा यादी सूचना फलकावर लावणे. |
| २१.०७.२०२२<br>२२.०७.२०२२<br>२३.०७.२०२२<br>२५.०७.२०२२ | गुरुवार<br>शुक्रवार<br>शनिवार<br>सोमवार | **४ दिवस** | निवड यादीतील विद्यार्थ्यांना प्रवेश देणे. |
| २६.०७.२०२२<br>२७.०७.२०२२ | मंगळवार<br>बुधवार | **२ दिवस** | प्रवेश शिल्लक असल्यास प्रतिक्षा यादीतील विद्यार्थ्यांना मूळ कागदपत्राच्या आधारे प्रवेश देणे. |
| २८.०७.२०२२<br>२९.०७.२०२२ | गुरुवार<br>शुक्रवार | **२ दिवस** | दुसऱ्या प्रतिक्षा यादीतील विद्यार्थ्यांना प्रवेश शिल्लक असतील तर मूळ कागदपत्रांच्या आधारे प्रवेश देणे. |

(महेश चोथे)
**शिक्षण उपसंचालक,**
**कोल्हापूर विभाग, कोल्हापूर**

Other district .timetable-2022-23 bhosale